CorelDRAW
Ps
Ai
Id
पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

काजळ
अधिक मास
अधिक खास
पुरुषोत्तम मास करिता खास ऑफर
चांदीची जोडवी
100 % मजुरीवर सूट
ऑफर कालावधी: 17 मे 2026 ते 15 जून 2026
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर 9601222777, 9615222777

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १२४ । किंमत - २ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शनिवार । २३/०५/२०२६ । पाने -६

100th
Anniversary
Estd 1927
Dande Gold & Diamonds

अधिक मास निमित्त
पायल व जोडवी महोत्सव

गोविंद TM
दर्जा, विश्वास, कला



अटी लागू*

जुनी चांदी देऊन नवीन चांदी घेण्याची सुवर्णसंधी

पायल व जोडवीच्या मजुरीवर
25% पर्यंत सूट

5000+डिझाइन्स | 17 मे ते 15 जून 2026

दत्तमंदिर स्टॉप,
नाशिक रोड
7774084019

वाजे पेट्रोल पंप समोर,
सिन्नर
8983275498

यशोधन कार्यालया समोर,
संगमनेर
9156009908

गोविंद TM
दर्जा, विश्वास, कला

दंडे गोल्ड & डायमंडस्
1927 पासून

# गोतस्करांवर आता थेट 'मकोका'ची कारवाई

## अनधिकृत कत्तलखाने बंद करण्याचे प्रशासनाला आदेश




युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राज्यात गोहत्या बंदी कायदा अस्तित्वात असतानाही गोतस्करी आणि अवैध कत्तलप्रकरणांवर आळा घालण्यासाठी राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. वारंवार संघटित पद्धतीने गोतस्करी करणाऱ्या टोळ्या व व्यक्तींवर आता थेट महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाई करण्याचे आदेश गृह विभागाने दिले आहेत.

यासोबतच गोवंशाची अवैध वाहतूक, बेकायदेशीर कत्तल आणि विनापरवाना कत्तलखाने रोखण्यासाठी सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायतींना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. त्यांच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत कत्तलखान्यांवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्यात संयुक्त तपासणी चौक्या आणि भरारी पथके स्थापन केली जाणार असून, पोलीस, परिवहन व पशुसंवर्धन विभागात स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्यात येणार आहेत. गोतस्करी किंवा अवैध वाहतुकीबाबतची माहिती नागरिकांनी डायल ११२ वर दिल्यास संबंधित यंत्रणांना तात्काळ कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# जिल्ह्यात एकाचवेळी सहकार विभागाच्या तीन ठिकाणी छापे

युवावार्ता (प्रतिनिधी)

जामखेड तालुक्यात अवैध सावकारीच्या तक्रारींची गंभीर दखल घेत सहकार विभागाने पोलीस प्रशासनाच्या मदतीने धडक कारवाई केली. तालुक्यात एकाच वेळी ३ ठिकाणी छापे टाकत अवैध सावकारी करणाऱ्याविरोधात कारवाईचा बडगा उगारण्यात आला. या कारवाईत कोरे धनादेश, खरेदीखते तसेच इतर आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त करण्यात आल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जामखेड तालुक्यात अवैध सावकारी सुरू असल्याबाबत प्रशासनाकडे आवश्यक कागदपत्रसह तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींच्या आधारे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, विभागीय निबंधक संभाजी निकम यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निबंधक तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक दिलीप तिजोरे यांनी जिल्ह्यातील विविध क्षेत्रीय




अधिकार्यांचा समावेश करून, जामखेडचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या समन्वयाने पथके तयार करून सदरची कारवाई केली. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ अन्वये ही कारवाई करण्यात आली. सहकार विभागाचे १६ अधिकारी-कर्मचारी आणि पोलीस दलाचे ६ अधिकारी-कर्मचारी अशा २२ जणांच्या संयुक्त पथकाने मंगळवारी दोन संशयित ठिकाणांवर छापे टाकले.

अचानक झालेल्या या कारवाईमुळे अवैध सावकारांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. छाप्या दरम्यान कोरे धनादेश, खरेदीखते, आर्थिक नोंदी असलेल्या वह्या, तसेच इतर महत्त्वाचे दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत. या कागदपत्रांच्या आधारे पुढील तपास आणि चौकशी सुरू करण्यात आली आहे. सहकार विभागाने तालुक्यातील सर्व नागरिकांना अवैध सावकारीविरोधात सहाय्यक निबंधक कार्यालय, जामखेड येथे आवश्यक कागदपत्रासह तक्रार दाखल केल्यास कठोर कारवाई केली जाईल असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**सहकार आणि पोलीस विभागाच्या संयुक्त पथकाने तीन ठिकाणी छापे टाकून महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली आहेत. सध्या या सर्व कागदपत्रांची सखोल पडताळणी व चौकशी सुरू आहे. सदर पडताळणीअंती पुढील आवश्यक ती कारवाई केली जाईल. नागरिकांनी आर्थिक गरजेसाठी शक्यतो राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, पतसंस्था अथवा परवानाधारक सावकार यांच्याकडूनच कर्ज घ्यावे. - दिलीप तिजोरे, सहाय्यक निबंधक, जामखेड.**

# शेतकऱ्यांना बँकांनी 'सिबिल स्कोअर' विचारू नये - मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई (वृत्तसंस्था)

पीक कर्ज देताना कोणत्याही बँकेने शेतकऱ्यांकडे 'सिबिल स्कोअर' ची मागणी करू नये, अन्यथा संबंधित बँक शाखेवर कठोर कारवाई व गुन्हे दाखल केले जातील, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.



सिबिल स्कोअरमुळे शेतकऱ्यांना कर्ज नाकारणे पूर्णपणे अस्वीकार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.सह्याद्री अतिथीगृहावर पार पडलेल्या १६७ व्या राज्यस्तरीय बँकर समितीच्या बैठकीत बोलताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, शेतकऱ्यांना कर्ज नाकारल्यास त्याचे अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होऊ शकतात आणि यामुळे शेतकरी आत्महत्येसारख्या घटनांना खतपाणी मिळू शकते.

नियम मोडणाऱ्यांवर कडक कारवाई: राज्य सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँक (ठइख) यांच्या स्पष्ट सूचना असतानाही अनेक बँका शेती कर्जासाठी सिबिल स्कोअरची मागणी करत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी निदर्शनास आणून दिले. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बँक शाखांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

तसेच नियमांचे पालन न करणाऱ्या काही बँकांवर यापूर्वी गुन्हे दाखल करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.वेंद्र फडणवीस यांनी जोर देऊन सांगितले की, सिबिल स्कोअर शेती कर्जासाठी बंधनकारक नाही. जर एखादा शेतकरी कर्जाच्या इतर सर्व निकषांमध्ये बसत असेल, तर केवळ सिबिल स्कोअरचे कारण देऊन बँकांना त्याचे कर्ज नाकारण्याचा कोणताही अधिकार नाही.

# राज्यावर तिहेरी संकट! पाणीटंचाई, डिझेल तुटवडा आणि अघोषित लोडशेडिंगमुळे बळीराजा अडचणीत

युवावार्ता (प्रतिनिधी)

सध्या संपूर्ण महाराष्ट्र कडक उन्हाच्या झळा सोसत असतानाच, राज्यावर विशेषतः मराठवाडा आणि इतर ग्रामीण भागांवर तिहेरी संकट कोसळले आहे. एकीकडे तीव्र पाणीटंचाई, दुसरीकडे शेतीकामाच्या ऐन हंगामात निर्माण झालेला डिझेल तुटवडा, आणि त्यातच भर घालणारे अघोषित लोडशेडिंग यामुळे ग्रामीण भागातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. या तिहेरी संकटामुळे बळीराजा संकटात सापडला आहे. पाणी, वीज आणि इंधन या तीनही जीवनावश्यक घटकांसाठी ग्रामीण भागाला सध्या संघर्ष करावा लागत आहे. सरकारने या तिहेरी संकटाची गंभीर दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, पेट्रोल पंपांवर डिझेलचा पुरवठा सुरळीत करावा आणि अघोषित लोडशेडिंग त्वरित थांबवून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी तीव्र मागणी आता ग्रामीण भागातून होत आहे.डिझेल टंचाईमुळे शेतीची मशागत खोळंबलीमान्सूनपूर्व शेतीच्या कामांना सध्या वेग आला आहे. मात्र, ग्रामीण भागातील पेट्रोल पंपांवर डिझेलचा तीव्र तुटवडा जाणवत आहे. शेतकरी आपल्या ट्रॅक्टर आणि इतर यंत्रांसाठी डिझेल मिळवण्यासाठी पेट्रोल पंपांवर तासन्तास रांगा लावून उभे आहेत. अनेक तास प्रतीक्षा करूनही शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी कॅनभर डिझेल देखील मिळणे कठीण झाले आहे. डिझेलअभावी ट्रॅक्टर जागच्या जागी उभे असल्याने शेतीची मशागत आणि पेरणीपूर्व कामे पूर्णपणे खोळंबली आहेत.ऐन उन्हाळ्यात पाण्यासाठी वणवणयंदा उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली असून ग्रामीण भागात जलसाठे तळ गाठू लागले आहेत. त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तीव्र संघर्षाला सामोरे जावे लागत आहे. महिला आणि बालकांना पाण्यासाठी मैलोन्मैल पायी भटकंती करावी लागत आहे. अनेक गावांमध्ये विहिरी आणि कूपनलिका कोरड्या पडल्याने पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ आली आहे.अघोषित लोडशेडिंगवीज वितरण कंपनीच्या अघोषित लोडशेडिंगने ग्रामीण भागातील अडचणींमध्ये आणखी भर घातली आहे. विहिरीत पाणी आहे, पण वीज नाही, वीज आली तर डिझेल नाही, अशी विदारक स्थिती सध्या शेतकऱ्यांची झाली आहे.

# संगमनेरच्या तरुणाला नगरमध्ये अटक

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - शहरातील केडगाव बायपास परिसरात गावठी कट्टा बाळगणार्या संगमनेरच्या तरूणाला कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून गावठी कट्टा व तीन जिवंत काडतुसे असा एकूण ८३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, त्याने ज्याच्याकडून हा कट्टा घेतला तो पसार झाला आहे.

याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अंमलदार सुरज कदम यांनी फिर्याद दिली आहे. शहबाज निसार शेख (वय ३४, रा. रहेमतनगर, जोर्वे नाका, तांबोळी हॉस्पिटलसमोर, संगमनेर, मुळ रा. एचडीएफसी बँकेशेजारी, सोनई, ता. नेवासा) असे ताब्यात घेतलेल्या तरूणाचे नाव आहे. बुधवारी (२० मे) सायंकाळी ४.५० वाजण्याच्या सुमारास केडगाव बायपास रस्त्यावरील अनुराज टायर्स समोरील बंद पडलेल्या टपरीजवळ संशयित हालचाली करणार्या शहबाज निसार शेख यास ताब्यात घेण्यात आले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे विनापरवाना एक लोखंडी स्टील रंगाचे गावठी बनावटीचा कट्टा आढळून आला. याशिवाय संशयिताकडून तीन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. असा एकूण ८३ हजार रूपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. संशयित आरोपीने हे शस्त्र केडगाव बायपास परिसरात एका अनोळखी इसमाकडून घेतल्याची प्राथमिक माहिती तपासात समोर आली आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे हे करीत आहेत.

# संत नामदेव महाराज भागवत धर्माचे आद्य प्रचारक व किर्तन परंपरेचे जनक

**संत नामदेव हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे आद्य प्रचारक, थोर संत कवी आणि कीर्तन परंपरेचे जनक मानले जातात. त्यांनी १३व्या-१४व्या शतकात भागवत धर्माचा आणि विठ्ठल भक्तीचा प्रचार करून सामान्य जनतेला भक्तिमार्ग दाखवला.**



**जन्म व कौटुंबिक पार्श्वभूमी**

नामदेवांचा जन्म शके ११९२, कार्तिक शुद्ध एकादशी, म्हणजेच २६ ऑक्टोबर १२७० रोजी नरसी-बामणी या गावी झाला. हे गाव सध्याच्या हिंगोली जिल्ह्यात येते. त्यांचे वडील दामाशेटी म्हणजेच दामाजी शेट आणि आई गोणाई. त्यांचे आडनाव रेळेकर होते. शिंपी म्हणजेच छीपा या व्यवसायातील हे कुटुंब सात पिढ्यांपासून विठ्ठलभक्त होते. त्यांचे पूर्वज यदुशेठ हे मोठे भगवद्भक्त होते. नामदेवांना आऊबाई नावाची थोरली बहीण होती. त्यांचा विवाह राजाई उर्फ राधाबाई यांच्याशी झाला. त्यांना नारा उर्फ नारायण, विठा, गोंदा, महादा असे चार पुत्र आणि लिंबाई नावाची एक मुलगी होती. त्यांच्या घरात एकूण १५ माणसे होती. स्वतःला 'नामयाची दासी' म्हणवणाऱ्या संत जनाबाई याही त्यांच्याच कुटुंबाचा भाग होत्या. बालपण पंढरपुरात गेल्याने लहानपणापासूनच त्यांच्यावर विठ्ठलभक्तीचे संस्कार झाले.



**आध्यात्मिक जडणघडण**

तारुण्यात नामदेव गर्विष्ठ झाले होते. 'मला देव भेटतो' असा त्यांना अहंकार झाला होता. तेरढोकी येथे गोरा कुंभाराच्या घरी संतांचा मेळा भरला होता. तिथे निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई, चोखामेळा हे सर्व संत जमले होते. ज्ञानेश्वरांच्या विनंतीवरून गोरोबाकाकांनी प्रत्येकाची पारख केली. त्यांनी थापटण्याने सर्वांच्या डोक्यावर टिचकी मारली. सर्व मडकी वाजली, पण नामदेवांच्या डोक्यावर टिचकी मारताच 'कच्चे मडके' असा आवाज आला. म्हणजे नामदेव अजून आत्मज्ञानाने परिपक्व झाले नव्हते. हा प्रसंग नामदेवांच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. अपमानाने व्यथित झालेले नामदेव विठ्ठलाकडे गेले. तेव्हा विठ्ठलाने त्यांना विसोबा खेचर यांना गुरू करण्यास सांगितले. विसोबा खेचर हे मूळचे शिवभक्त पण ज्ञानेश्वरांचे शिष्य होते. त्यांनी नामदेवांचा अहंकार घालवून त्यांना खरा भक्तिमार्ग दाखवला.

**कार्य व प्रचार**

श्री विठ्ठलाच्या आज्ञेने संत नामदेव संत ज्ञानेश्वरांसोबत भारतभर तिर्थ यात्रेला गेले. 'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' हे त्यांच्या आयुष्याचे ब्रीदवाक्य होते. त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून भागवत धर्म घराघरात पोहोचवला. 'नामदेव कीर्तन करी, पुढे देव नाचे पांडुरंग' अशी त्यांची ख्याती होती. ते बहुश्रुत आणि अभ्यासू होते. कीर्तनात अनेक ग्रंथांचे दाखले देत.

ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतर नामदेवांनी एकट्याने भारत भ्रमण केले. ते १८ वर्षे पंजाबात राहिले. तिथे त्यांनी भगवन्नामाचा प्रचार केला. त्यांच्या प्रभावामुळेच शीख धर्माचे संस्थापक गुरू नानकदेव यांच्यावर वारकरी संप्रदायाचा प्रभाव पडला. नामदेवांचे ६२ अभंग 'नामदेवजी की मुखबानी' या नावाने गुरू ग्रंथ साहेबात गुरुमुखी लिपीत घेतले आहेत. त्यांनी मराठीत सुमारे २५०० अभंग आणि हिंदी-शौरसेनी भाषेत १२५ पदे रचली. 'आदि', 'समाधी' आणि 'तीर्थावळी' या तीन अध्यायांतून त्यांनी ज्ञानेश्वरांचे चरित्रही सांगितले आहे.

**तत्त्वज्ञान व शिकवण**

नामदेवांचे तत्त्वज्ञान निर्गुण-सगुणाचा समन्वय साधणारे होते. 'कुंभाराच्या घरी मडक्यात देव दिसे, चांभाराच्या घरी जोड्यात देव बसे' असे सांगून त्यांनी सर्वांभूती भगवंत पाहायला शिकवले. त्यांनी जातिभेद, कर्मकांड आणि बाह्य अवडंबराला कडाडून विरोध केला. 'तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल' हा अभंग त्यांच्या सर्वसमावेशक दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. नामस्मरण हेच सर्वात सोपे आणि श्रेष्ठ साधन आहे, हे त्यांनी ठासून सांगितले. 'अमृताहुनि गोड नाम तुझे देवा' या अभंगातून नामाची महती गायली.

**चमत्कार -**

त्यांच्या आयुष्यात अनेक चमत्कार घडले. लहानपणी 'दगडाची खीर' हा प्रसंग प्रसिद्ध आहे. देवाने खीर खाल्ल्याशिवाय मी जेवणार नाही असा हट्ट त्यांनी धरला तेव्हा विठ्ठलाने प्रत्यक्ष प्रकट होऊन नैवेद्य ग्रहण केला. परभणी जिल्ह्यातील हिंगोली तालुक्यातील औंढा नागनाथ मंदिराच्या पुजाऱ्यांनी मंदिरासमोर कीर्तन करण्यास विरोध केला म्हणून मंदिराच्या पाठीमागे कीर्तन केले व मंदिरच त्यांच्यासाठी पश्चिमेला फिरले. तेव्हापासून औंढा नागनाथ येथील नागनाथ या ज्योतिर्लिंग मंदिराचे तोंड पश्चिमेकडे आहे. मेलेली गाय जिवंत करणे, जनाबाईसाठी पावसात छपरी उचलून धरणे असे अनेक प्रसंग त्यांच्या भोळ्या भक्तीची साक्ष देतात.

**समाधी-** सुमारे ८० वर्षे आयुष्य लाभलेल्या नामदेवांनी शके १२७२, आषाढ वद्य त्रयोदशी, म्हणजेच ३ जुलै १३५० रोजी पंढरपूर येथे विठ्ठल मंदिराच्या महाद्वाराच्या पहिल्या पायरीवर समाधी घेतली. 'नामयाची पायरी' म्हणून ती आजही प्रसिद्ध आहे.

- संत नामदेवांनी महाराष्ट्राला भक्तीचा, समतेचा आणि कीर्तनाचा वारसा दिला. उत्तर आणि दक्षिण भारताला जोडणारा ते एक महत्त्वाचा दुवा ठरले. त्यांच्यामुळेच वारकरी संप्रदाय देशव्यापी झाला. आजही लाखो वारकरी 'ज्ञानदेव-तुकाराम' बरोबर 'नामदेव' यांचा जयघोष करत वारीला जातात.



सदाशिव रामनाथ मुळे
युवावार्ता प्रतिनिधी, संगमनेर

**पुरुषोत्तम मासानिमित्त श्री क्षेत्र भू वैकुंठ पंढरपूर येथे भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरू झाला असून दिनांक २४ मे रोजी त्याची सांगता आहे. यामध्ये संत नामदेव गाथा पारायणासाठी सुमारे ११००० लोक उपस्थित आहेत. त्यानिमित्त संत शिरोमणी नामदेवांचा संक्षिप्त परिचय........**

# मराठा समाजासाठी मोठी घोषणा !

## अण्णासाहेब पाटील महामंडळाला १५० कोटी रूपये

युवावार्ता (प्रतिनिधी)

मराठा समाजाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी आनंदवार्ता दिली आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाला १५० कोटींचा निधी दिल्याचे जाहीर करण्यात आले आहे. तर अर्थसंकल्पात महामंडळासाठी एकूण ७५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात १५० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. नियोजन विभागाकडून शासन निर्णय जारी केला आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटीत आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. त्याचवेळी ही मोठी अपडेट समोर आली आहे. यामुळे मराठा समाजात नवीन उद्योजक तयार होण्यास मदत होईल.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ विविध योजना राबवते. त्यासाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षात फडणवीस सरकारने ७५० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली होती. त्यापैकी ३०० कोटींचा निधी वर्गही करण्यात आला होता. त्याविषयीचा शासन निर्णय सुद्धा प्रसिद्ध करण्यात आला होता. आता नियोजन विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.

आता नियोजन विभागाने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाला १५० कोटी निधी वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. सदरचा निधी खर्च करताना राज्य शासनाची कार्यनियमावली, वित्तीय नियमावली, अटी व शर्तींचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हा खर्च करताना कोणतीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना २९ ऑगस्ट १९९८ रोजी करण्यात आली होती. महामंडळाच्या माध्यमातून मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास, सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. अर्थसंकल्पातील मंजूर निधीपैकी २० टक्के, ३० टक्के, ४० टक्के आणि ५० टक्के अशा प्रकारे निधी वितरीत करण्यात येतो. हा निधी खर्च केल्याची माहिती नियोजन विभागाला दिल्या जाते. त्यानंतर पुढील निधीची तरतूद करण्यात येते. स्वयंरोजगार आणि उद्योजकतेला गती देणाऱ्या योजना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ राबवते. त्यासाठी राज्य सरकारकडून निधी वितरीत करण्यात येतो. या योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा २०१७ मध्ये वाढवून ६ लाख आणि पुढे ८ लाख रुपये इतकी करण्यात आली आहे.

# जरांगेंनी 30 तारखेचे उपोषण मागे घ्यावे - लाड

जालना (वृत्तसंस्था)

मराठा आंदोलनाचा केंद्रबिंदू असणाऱ्या आंतरवाली सराटीत सध्या मराठा आंदोलक मनोज जरांगे व भाजप आमदार प्रसाद लाड यांच्यात चर्चा सुरू आहे. त्यात लाड यांनी जरांगे यांना त्यांचे ३० मेपासून सुरू होणारे संभाव्य आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले. त्यावर जरांगे यांनी सध्या तरी कोणतीही भूमिका स्पष्ट केली नाही. पण सरकारने मराठा समाजाला अद्याप सरसकट कुणबी प्रमाणपत्र का दिले नाही? असा सवाल करत लाड यांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, प्रसाद लाड यांच्या आवाहनावर जरांगे कोणती भूमिका घेतात? याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे.

मनोज जरांगे यांनी येत्या ३० तारखेपासून आंतरवाली सराटीत उपोषण सुरू करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून पुन्हा एकदा राज्यात मराठा आरक्षणाचे रान पेटले आहे. जरांगेंनी दोन दिवसांपूर्वी नुकतीच प्रसाद लाड यांना भेटीचे निमंत्रण दिले होते. त्यानुसार लाड यांनी आज त्यांची आंतरवाली सराटीत जाऊन भेट घेतली. यावेळी उभय नेत्यांत प्रदिर्घ काळ चर्चा झाली. त्यात लाड यांना जरांगे यांना सध्याचा उन्हाचा कडाका व शेतीच्या मशागतीची कामे पाहता त्यांचे आगामी उपोषण लांबणीवर टाकण्याचे आवाहन केले. प्रसाद लाड म्हणाले, सध्या कडाक्याचे उन पडले आहे. तसेच खरीप हंगामाचीही कामेही सुरू आहेत. त्यामुळे माझे मनोज जरांगे यांना त्यांचे ३० मेपासून सुरू होणारे उपोषण लांबणीवर टाकण्याचे आवाहन आहे. सरकार आपल्या जागी आहे. मी मराठा समाजातर्फे त्यांना हे आवाहन करत आहे. मी गीतेतला सार घेऊन येथे आलो आहे. मुख्यमंत्री जातीचे नसतानाही त्यांनी मराठा समाजाला आरक्षण दिले. हा जरांगे यांचाच विजय आहे. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांना मानणारे कार्यकर्ते आहोत, असे ते म्हणाले.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# सहकारी निवडणुकांसाठी निर्णय अधिकाऱ्यांच्या नामतालिकेसाठी पात्र व्यक्तींनी ३१ मे पर्यंत अर्ज करावेत

अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)-

महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्या निर्देशानुसार सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांची ३ वर्षांसाठी नामतालिका तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी पात्र व्यक्तींनी दि. ३१ मे २०२६ पर्यंत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात अर्ज व आवश्यक कागदपत्रे दोन प्रतींत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

'क' व 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्तीच्या प्रक्रियेसाठी सहकार खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी, शासकीय विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांतील सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी, वकील, सनदी लेखापाल, प्रमाणित लेखापरीक्षक, स्थानिक स्वराज्य संस्थेतील व खासगी अनुदानित शाळांमधील सेवानिवृत्त शिक्षक, तसेच सहकारी संस्थांतील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी आणि निवडणूक कामकाजाचा अनुभव असलेल्या व्यक्तींना अर्ज करता येणार आहे.

नामतालिका तयार करण्यासाठी ३० एप्रिल २०२६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, अर्ज स्वीकृतीची प्रक्रिया १ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत सुरू राहणार आहे. प्राप्त अर्जांची छाननी १ जून ते १५ जून दरम्यान करण्यात येईल. त्यानंतर पात्र निवडणूक निर्णय अधिकारी व प्राधिकृत अधिकारी यांची नामतालिका १६ जून ते २३ जून २०२६ या कालावधीत तयार करण्यात येणार आहे. अंतिम यादी ३० जून २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे.

हे अर्ज व आवश्यक कागदपत्रे संबंधित जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करावीत, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच, अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व सहकार आयुक्त यांच्या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहेल.

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा- अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ सेतु/ जन्म नोंद/५४२/२०२६ दिनांक - ०८/०५/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. इरफानखान इस्माईलखान पठाण, रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक १७/०४/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे इरफानखान इस्माईलखान पठाण यांचा जन्म मौजे संगमनेर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक २५/०५/१९७५ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**श्री छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को–ऑप. बँक लि., बीड**
मुख्य कार्यालय, जनाधार भवन, जालना रोड, बीड- फोन नं. (०२४४२) २२२१५४

**जाहीर प्रगटन**

खालील लॉकर धारकास कळविण्यात येते की, आपण खालील दिनांकापासून आपणाला वेळोवेळी नोटीस देऊनही लॉकर ऑपरेट न केल्यामुळे सदर जाहीर प्रगटनाद्वारे आपणास विनंती करण्यात येते की, सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आपण आपले लॉकर ऑपरेट करावे, अन्यथा आपले लॉकर नियमानुसार पंचनामा करुन तोडण्यात येईल. त्यासाठी होणाऱ्या खर्चाची जबाबदारी आपल्यावर राहील.

| लॉकर धारकांचे नाव | लॉकर धारकांचे पत्ता | लॉकर क्रमांक | शाखा | लॉकर ऑपरेट दिनांक |
|---|---|---|---|---|
| श्री. शिवाजी भाऊसाहेब खेडकर आणि श्री. दिनेश विजय मंडलिक यांचे संयुक्तीक लॉकर | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर, कृष्णापब्लिक इंग्लिश स्कुल जवळ,मालदाड रोड, संगमनेर | B-75 | संगमनेर | १४/०२/२०१४ |

दि. २२/०५/२०२६
स्थळ – संगमनेर

स्वाक्षरीत
शाखा व्यवस्थापक
संगमनेर शाखा

# खेड तालुक्यातील रेटवडीत थरारक हल्ला

## हायवा घालून चिरडण्याचा प्रयत्न; परिसरात दहशत




खेड (प्रतिनिधी)-

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील रेटवडी येथे अवैध गौण खनिज उत्खनन होत असल्याची तक्रार देणाऱ्या युवकावरच प्राणघातक हल्ला झाला आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणाची तक्रार करणारे अमोल काळे यांच्यावरच यापूर्वी गुन्हा दाखल करण्यात आला होता. अमोल काळे यांनी महसूल प्रशासनाकडे गुगल लोकेशन, फोटो आणि व्हिडिओ पुरावे सादर करून अवैध उत्खननाची तक्रार दिली होती. मात्र, संबंधितांवर कारवाई करण्याऐवजी त्यांच्यावरच गुन्हा दाखल झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

अमोल काळे यांना न्यायालयातून अटकपूर्व जामीन मंजूर झाल्यानंतर काल रात्री त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. अमोल काळे एका हॉटेलमध्ये असल्याची माहिती मिळताच गोरख म्हसाडे आणि त्यांच्या साथीदारांनी घटनास्थळी धाव घेत हल्ला केला. या हल्ल्यात हायवा वाहनाचा वापर करून अमोल काळे यांना चिरडण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच, परिसरातील अनेक वाहनांवर हायवा घालत दहशत माजवण्यात आली. संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, त्यातील दृश्ये अत्यंत धक्कादायक असल्याचे दिसत आहे.

अमोल काळे हे मृत पावले, समजून हे टोळके इथून गेले. त्यानंतर उपस्थित जमावाने अमोल काळे यांना खेड येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले आहे. या घटनेनंतर रात्री उशिरापर्यंत खेड पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी स्वतः घटनास्थळी भेट देत सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली आणि तातडीने तक्रार दाखल करण्याचे आदेश दिले.

मात्र, एवढी गंभीर घटना घडूनही उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. पोलीस आणि महसूल प्रशासन यांनी अशा भयावह, क्रूर हत्या करण्याचा प्रकार करणाऱ्या माती, मुरूम, वाळू तस्कर लोकांवर जुन्नर, खेड, आंबेगाव तालुक्यात मोक्का नुसार कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# अहिल्यानगर जनगणना मोहिमेत दोन प्रगणकांनी रचला नवा आदर्श



अहिल्यानगर ()-

भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने देशभर सुरू असलेल्या जगातील सर्वात मोठ्या डिजिटल जनगणना मोहिमेला अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात वेग आला असून, आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना - २०२७ चे काम युद्धपातळीवर सुरू आहे. प्रत्येक प्रगणकाला ३० दिवसांचा कालावधी आणि निश्चित प्रभागनिहाय घरांची जबाबदारी देण्यात आलेली असताना, काही कर्मचाऱ्यांनी आपल्या कामातून वेगळाच आदर्श निर्माण केला आहे. प्रभाग समिती क्रमांक ०२, शहर विभागातील जनगणना २०२७ चे पर्यवेक्षक अनिल सुद्रिक यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेले प्रगणक अरुण मारुती पवार व सौ. श्रद्धा सुभाष कुलकर्णी यांनी आपल्या वाट्याला आलेले जनगणनेचे काम तब्बल १०० टक्के पूर्ण करून एक वेगळाच विक्रम प्रस्थापित केला आहे.

विशेष म्हणजे, कडक उन्हाळा, वेळेचे बंधन आणि तांत्रिक प्रक्रियेची आव्हाने असतानाही, त्यांनी अत्यंत कमी कालावधीत नकाशा तयार करणे, घरांना क्रमांक देणे आणि एचएलओ पच्या साहाय्याने घरगणना प्रक्रिया वेगाने आणि अचूकपणे पूर्ण केली. त्यांच्या या कामगिरीने जनगणना मोहिमेत नवा मापदंड निर्माण केला असल्याची चर्चा महानगरपालिका वर्तुळात सुरू आहे. या उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कामगिरीची दखल घेत अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर तसेच सहायक आयुक्त मेहेर लहारे यांनी त्यांचा विशेष सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी त्यांच्या कार्याचे कौतुक करत, इतर प्रगणकांसाठीही हा आदर्श असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

प्रभारी अधिकारी अजीम शेख यांचे मार्गदर्शन या गटाला लाभले. कडक उन्हात रस्त्यावर फिरत, प्रत्येक घरापर्यंत पोहोचत आणि वेळेची शर्यत जिंकत पूर्ण झालेली ही मोहीम आता इतर प्रगणक व पर्यवेक्षक यांच्यासाठी प्रेरणेचा विषय ठरत आहे. नियोजन, मेहनत आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर असेल, तर कोणतेही लक्ष्य अशक्य नसते, हे या कामगिरीतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. अहिल्यानगरच्या जनगणना मोहिमेत आता या कामगिरीची जोरदार चर्चा सुरू असून, अनेकांच्या मते हे केवळ काम पूर्ण होणे नसून, कर्तव्यनिष्ठा, समर्पण आणि सांघिक कार्याचा आदर्श नमुना आहे.

# केंद्र सरकारच्या १२ वर्षांच्या पूर्ततेनिमित्त भाजपचे महासंपर्क अभियान

मुंबई (प्रतिनिधी)- केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या आणि तिसऱ्या कार्यकाळातील दोन वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भारतीय जनता पक्ष देशभरात महिनाभर व्यापक जनसंपर्क मोहीम राबविणार आहे. हा उपक्रम ९ जूनपासून सुरू होऊन ९ जुलैपर्यंत चालणार आहे. पक्षाने या राष्ट्रव्यापी मोहिमेसाठी '१२ वर्षे, १२ मोठ्या कामगिरी' ही संकल्पना निश्चित केली आहे.

या मोहिमेदरम्यान केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री, खासदार, आमदार आणि पक्षाचे पदाधिकारी जाहीर सभा, पत्रकार परिषदा, आणि संवाद कार्यक्रमांचे आयोजन करणार आहेत. राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात येणाऱ्या या मोहिमेत अगदी बूथ पातळीपर्यंतच्या कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग निश्चित केला जाणार आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने (आरएसएस) नुकत्याच राबवलेल्या गृहसंपर्क मोहिमेच्या धर्तीवरच भाजप हा उपक्रम चालवणार आहे.

# २२ व २३ मे रोजी राहाता व कोपरगाव तालुक्यात नो फ्लाय झोन घोषित




अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)-

केंद्रीय संरक्षण मंत्री हे २३ मे २०२६ रोजी राहाता व कोपरगाव तालुक्यात दौऱ्यावर येत आहेत. या दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) नुसार दि. २२ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजेपासून दि. २३ मे २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत संपूर्ण राहाता व कोपरगाव तालुक्यात नो फ्लाय झोन (ड्रोन उडविण्यावर बंदी) घोषित केला आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर भारतीय न्याय संहिता कलम २२३ तसेच इतर लागू असलेल्या कायद्यान्वये कारवाई करण्यात येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# आमचे शिक्षक पेपर नाही, थोबाड फोडायचे...




वरील वाक्य वाचून आश्चर्य वाटले असेल. हे लिहिण्याचे कारण म्हणजे, सध्या पेपर फूटी प्रकरण सुरू आहे. आमची पिढी शाळेत होती, तेव्हा टूजी, थ्री जी, फोर जी, फाईव्ह जी नव्हते, गुरूजी होते. सर्व पाढे पाठ करून घ्यायचे. ज्यांचे पाढे पाठ आहेत, त्यांना कॅल्क्युलेटरची गरज पडत नाही. सांगितलेले पाढे पाठ नसले की, गुरुजी जवळ येऊन थोबाड फोडायचे. घरी जाऊन सांगण्याची हिंमत नव्हती, कारण घरचे म्हणायचे, अजून फटकून काढा.

१९६० च्या दशकातील आमची पिढी आज सत्तरीच्या उंबरठ्यावर आहे. परंतु प्राथमिक शाळेत, माध्यमिक शाळेत पाया पक्का करून घेतला. कॉलेजमध्येही संस्कारी वातावरणात घडलो. शाळेत एक दिवस गैरहजर असल्यास फटके मिळायचे. कोणताही पेपर फुटायचा नाही. शंभर मार्कांची परीक्षा द्यावी लागायची. खरे तर, त्यावेळी रोगट स्पर्धा नव्हती. हे लिहिण्यामागचे खरे कारण म्हणजे, नीट परीक्षेचे पेपर फुटले, ते आहे. हे शिक्षण व्यवस्थेचे अपयश आहे. आज शिक्षण व्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत. कॉलेजमध्ये न जाता सुद्धा आपल्या पाल्याला ९० टक्केच्या पुढे मार्क पडू शकतात, ही खात्री पालकांना झालेली आहे. कॉलेज जीवनाचा खरा आनंद काय असतो, हा विद्यार्थ्यांना घेता येत नाही.

सकाळपासून जे क्लास सुरू होतात, ते रात्री झोपेपर्यंत. कुठे थांबायचे, हे कळतच नाही. प्रत्येक पालकांना असे वाटते की, आपल्या पाल्याला शंभर टक्के मार्क पडावेत. बैलगाडीला बैल जसे जुंपतात, तसे आपण आपल्या पाल्याला सकाळपासून संध्याकाळपर्यंत क्लास नावाच्या गोंडस नावाखाली जुंपलेले असतो. क्लास लावायला हरकत नाही, परंतु संपूर्ण दिवसभर पळापळ करायची. घरी आल्यावर अभ्यास करायचा आणि दुसऱ्या दिवशी बातमी येते, पेपर फुटल्याची. विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचे काय होत असेल, हा प्रश्न खूप महत्त्वाचा आहे. सरकारने यावर खरोखर विचार केला पाहिजे. ज्युनिअर कॉलेजमध्ये वर्षभर विद्यार्थी आलेच पाहिजेत. जर विद्यार्थी कॉलेजमध्ये न येता उत्कृष्ट निकाल लागत असेल, तर हे कॉलेजचे अपयश आहे. कॉलेजमध्ये जाऊन नंतर तुम्ही जर क्लासला जात असाल, तर निश्चितच त्याचा फायदा होईल. परंतु आजकाल हा ट्रेंड बदलत चालला आहे. याचे खरे कारण म्हणजे संवादाचा अभाव.

शिक्षक, पालक, बालक आणि संस्थाचालक यांच्यामध्ये संवाद नव्हे, सुसंवाद हवा. हे सरस्वतीच्या मंदिराचे चार खांब आहेत. परंतु हे चारही खांब संवादाअभावी पोखरले गेले आहे. शिक्षणातून इनोवेशन, कंपेशन आणि पॅशन निर्माण होण्याची गरज आहे. त्यासाठी शिक्षणाची सुरुवात आणि शेवट प्रेममयता, ज्ञानाची सुरुवात आणि शेवट चारित्र्यसंपन्न, संस्कृतीची सुरुवात व शेवट परिपूर्णता अशी हवी. शिक्षक हा सेवापरायण आणि ज्ञानपरायण हवा. हे सर्व ठीक आहे, परंतु आजच्या पेपर फुटीच्या काळात हे शक्य आहे का? वैद्यकीय प्रवेश परीक्षा देऊन हजारो डॉक्टर निर्यात होतील, परंतु असे डॉक्टर काय कामाचे आहेत? कारण त्यांना पेपर अगोदरच मिळालेला होता. लाखो विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळणारा हा पेपर फुटीचा अध्याय असाच सुरू राहणार की, सरकार यावर काही उपाययोजना करणार, हे महत्त्वाचे आहे.

मोठमोठ्या जाहिराती करून विद्यार्थी आपल्याकडे कसे आकृष्ट होतील, हे बघितले जाते. समाजामध्ये एक प्रकारची रोगट स्पर्धा सुरू झाली आहे आणि हजारो विद्यार्थी त्याला बळी पडत आहे. आता पालकांनीच विचार करून आपल्या पाल्याला योग्य मार्गदर्शन करावे, त्याचेशी संवाद साधावा. आपला पाल्य कॉलेजमध्ये आठ तास जाईल आणि नंतर क्लासला जाईल, हे बघावे. या सर्व गोष्टींचे आत्मपरिक्षण करण्याची वेळ आली आहे. पेपर फूटीतून तयार झालेले डॉक्टर समाजाचे काय भले करणार? म्हणून डोळे झाकून अंधार करू नका. हे लिहिण्याचे कारण, आमच्या पिढीत शिक्षकांनी पेपर फोडला नाही, तर आमचे थोबाड फोडले. आज आमची पिढी अत्यंत सक्षमपणे समाजात उभी आहे. याचे श्रेय आमच्या शिक्षकांना जाते आणि पालकांना जाते.

**– प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

# परवानगीशिवाय शेतमाल खरेदी-विक्री करु नये - पणन संचालक शरद जेरे

अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)-

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ अंतर्गत राज्यातील शेतमाल खरेदी-विक्री व्यवहारांचे विनियमन करण्यात येत असून, परवानगीशिवाय सुरू असलेल्या व्यवहारांवर कारवाई करण्यात येणार आहे. सर्व व्यापारी, संस्था आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन करूनच व्यवहार करावेत, असे आवाहन पणन संचालक शरद जेरे यांनी केले आहे.

राज्यातील विविध भागांमध्ये काही व्यापारी, संस्था तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून कोणतीही आवश्यक परवानगी न घेता मोठ्या प्रमाणात शेतमाल खरेदी-विक्री व्यवहार सुरू असल्याच्या तक्रारी पणन संचालनालयास प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पणन संचालकांनी परिपत्रक जारी करून संबंधितांना नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र शासन राजपत्रातील अध्यादेश क्रमांक १५, दिनांक ०५ जुलै २०२६, तसेच त्यानंतर करण्यात आलेल्या सुधारित तरतुदींचा उल्लेख परिपत्रकात करण्यात आला आहे. त्यानुसार मुख्य अधिनियमातील कलम ५ मधील काही तरतुदींमध्ये बदल करण्यात आले असून, विशिष्ट परिस्थितीत बाजार समितीकडून विनियमन लागू राहणार नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तथापि, थेट पणन, खाजगी बाजार, शेतकरी ग्राहक बाजार तसेच ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्म यांसारख्या व्यवहारांसाठी संबंधित परवाने घेणे आवश्यक राहणार असल्याचे पणन संचालनालयाने कळविले आहे. आवश्यक परवानगी अथवा लायसन्सशिवाय शेतमाल खरेदी-विक्री व्यवसाय केल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

याबाबत काही तक्रार असल्यास संबंधित बाजार समिती प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन मंगेश सुरवसे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, यांनी केले आहे.

# संपादकीय...

## तरुण बेरोजगारीचा प्रश्न

भारताच्या सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेमध्ये रोख हस्तांतरण योजनांचे महत्त्व गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सुरुवातीला महिला, शेतकरी, वृद्ध आणि वंचित घटकांना केंद्रस्थानी ठेवून राबविल्या जाणाऱ्या या योजना आता शिक्षित बेरोजगार तरुणांकडे वळताना दिसत आहेत. देशातील अनेक राज्यांनी बेरोजगार युवकांना थेट आर्थिक मदत देण्यास सुरुवात केली आहे. या योजनांमागील उद्देश तरुणांना तात्पुरता आर्थिक आधार देणे असला, तरी त्यातून निर्माण होणारे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिणाम दूरगामी ठरणारे आहेत. देशात शिक्षण घेणाऱ्या तरुणांची संख्या वाढत असताना रोजगारनिर्मितीचा वेग मात्र त्यानुसार वाढलेला नाही. उच्च शिक्षण घेतल्यानंतरही लाखो तरुणांना योग्य नोकरी मिळत नसल्याने असंतोष वाढत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारे बेरोजगारी भत्त्याच्या माध्यमातून या वर्गाला दिलासा देण्याचा प्रयत्न करीत आहेत. कर्नाटक, हरियाणा, बिहार, राजस्थान, तामिळनाडू, केरळ, आसाम, पश्चिम बंगाल यांसारख्या राज्यांनी विविध स्वरूपातील योजना सुरू केल्या आहेत. काही राज्ये पदवीधर आणि पदविकाधारक तरुणांना दरमहा ठराविक रक्कम देत आहेत, तर काही ठिकाणी कौशल्य प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव यांचाही समावेश करण्यात आला आहे. या योजनांचा राजकीय संदर्भही तितकाच महत्त्वाचा आहे. देशातील तरुण मतदारांची संख्या मोठी असून बेरोजगारी हा निवडणुकांमधील अत्यंत संवेदनशील मुद्दा बनला आहे. त्यामुळे तरुणांना थेट आर्थिक मदत देणे हे सामाजिक संरक्षणाबरोबरच राजकीय गुंतवणुकीचे साधनही बनले आहे. मात्र केवळ रोख मदतीने बेरोजगारीचा मूलभूत प्रश्न सुटणार नाही, हे वास्तव नाकारता येणार नाही. भारतातील शिक्षण व्यवस्था आणि रोजगार बाजार यांच्या गरजांमध्ये मोठी दरी निर्माण झाली आहे. अनेक तरुण पदव्या मिळवत असले, तरी उद्योग, सेवा किंवा तंत्रज्ञान क्षेत्राला आवश्यक कौशल्ये त्यांच्याकडे नसतात. परिणामी, उच्चशिक्षित तरुणही अल्पकौशल्याच्या नोकऱ्यांमध्ये अडकतात किंवा बेरोजगार राहतात. आर्थिक सर्वेक्षणातील आकडेवारीनुसार अत्यल्प पदवीधरांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगार मिळत आहे. ही परिस्थिती केवळ आर्थिक नाही, तर सामाजिक अस्थिरतेलाही कारणीभूत ठरू शकते. म्हणूनच काही राज्यांनी रोख मदतीसोबत कौशल्य विकास, संवाद प्रशिक्षण, संगणक शिक्षण आणि प्रशिक्षणार्थी स्वरूपातील कामांचा समावेश केला आहे. हा दृष्टिकोन अधिक परिणामकारक मानला जातो. कारण केवळ भत्ता देण्यापेक्षा तरुणांना रोजगारक्षम बनविणे अधिक आवश्यक आहे. जगातील अनेक देशांमध्ये बेरोजगारी भत्ता योजना अस्तित्वात आहेत. आर्थिक मंदीच्या काळात अशा योजना नागरिकांना आधार देतात आणि कुटुंबांचे आर्थिक संतुलन राखण्यास मदत करतात. मात्र या योजना कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाहीत. उलट दीर्घकाळ मोठ्या प्रमाणात भत्ते दिल्यास लोकांमध्ये अवलंबित्व वाढण्याचा धोका असतो. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये ही बाब अधिक संवेदनशील आहे. कारण राज्यांची आर्थिक क्षमता मर्यादित असून सार्वजनिक गुंतवणुकीसाठी मोठ्या प्रमाणात निधी आवश्यक असतो. रस्ते, उद्योग, शिक्षण, आरोग्य, तंत्रज्ञान आणि कृषी क्षेत्रात दीर्घकालीन गुंतवणूक केल्याशिवाय मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊ शकत नाही. त्यामुळे रोख हस्तांतरण योजना आणि विकासाभिमुख गुंतवणूक यामध्ये संतुलन राखणे सरकारांसाठी अत्यंत आवश्यक आहे. भारत सध्या लोकसंख्यात्मक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर उभा आहे. देशातील तरुणांची संख्या प्रचंड आहे आणि दरवर्षी लाखो युवक रोजगार बाजारात प्रवेश करीत आहेत. हीच तरुण शक्ती योग्य दिशेने वापरली गेल्यास भारताला आर्थिक महासत्ता बनवू शकते. मात्र बेरोजगारी, कौशल्यांचा अभाव आणि संधींची कमतरता कायम राहिली, तर हीच स्थिती सामाजिक असंतोष निर्माण करू शकते. विशेषतः तरुण महिलांमध्ये शिक्षण, रोजगार आणि प्रशिक्षणापासून दूर राहण्याचे प्रमाण चिंताजनक आहे. सामाजिक बंधने, सुरक्षित रोजगाराचा अभाव आणि आर्थिक विषमता यामुळे महिलांचा सहभाग कमी राहतो. त्यामुळे बेरोजगारीविरोधातील कोणतीही योजना महिलांच्या सहभागाशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. आज कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलन आणि तंत्रज्ञानातील बदलांमुळे पारंपरिक रोजगारांचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे तरुणांना भविष्यातील कौशल्यांसाठी तयार करणे अधिक गरजेचे बनले आहे.


धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५


# जिजामाता शाळेच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश

संगमनेर

युवावार्ता (प्रतिनिधी)

जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शाळेतील इयत्ता पाचवीचे १३ व आठवीचे ७ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले असून विद्यार्थ्यांचा सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे सहकार्य यांमुळे हे यश प्राप्त झाले आहे. शाळेच्या संस्थापक अध्यक्षांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या मेहनतीला व शिक्षकांच्या अथक प्रयत्नांना मिळालेले हे यश अत्यंत अभिमानास्पद आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांनी अशाच प्रकारे यशाची परंपरा कायम ठेवावी. शिष्यवृत्ती मार्गदर्शनासाठी विशेष वर्ग, सराव परीक्षा व वैयक्तिक मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांना मोठा फायदा झाला आहे त्याचप्रमाणे इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यातही अशाच प्रकारे गुणवंत विद्यार्थी घडविण्यासाठी शाळा कटिबद्ध असल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.

# मातंग समाजातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाची स्वप्ने पाहावीत : सुनील वारे



लोणी

(युवावार्ता प्रतिनिधी)-

लोणी येथील सुरभी मंगल कार्यालयात अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई यांच्या वतीने मातंग समाजातील इयत्ता दहावीपासून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यशवंतांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे (आयआरएएस) उपस्थित होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून आर्टीच्या निबंधक इंदिरा अस्वार यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. भाऊसाहेब पवार यांनी समाजातील विद्यार्थ्यांपर्यंत आर्टीच्या योजनांची माहिती पोहोचविण्याचा उद्देश स्पष्ट केला. सुनील वारे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून आयएएस, आयपीएस, डॉक्टर, इंजिनिअर आणि लेखक होण्याचे ध्येय ठेवण्याचे आवाहन केले. यासाठी आर्टीतर्फे सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

इंदिरा अस्वार यांनी विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा, व्यावसायिक प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य योजनांची माहिती दिली, तसेच विद्यार्थी आणि पालकांच्या शंकांचे निरसन केले. दुसऱ्या सत्रात दे आसरा संस्थेच्या मनस्वी तपासे यांनी, नोकरी घेणारे नव्हे, तर नोकरी देणारे बना, हा संदेश देत व्यावसायिक प्रशिक्षणाविषयी मार्गदर्शन केले. विविध कौशल्य विकास योजनांची माहितीही यावेळी देण्यात आली. या कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त शिक्षक, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक व समाजातील मान्यवर उपस्थित होते.

# ज्ञानमाता विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम




संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

ज्ञानमाता विद्यालयाचा इयत्ता दहावी वर्गाचा निकाल उत्कृष्ट लागला असून, दहावीतील सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण शेकडा निकाल हा ९५.८८% लागला आहे.

पुणे एसएससी बोर्ड परीक्षेत कुमारी मरियम तनवीर इनामदार ह्या विद्यार्थिनीने ९१.८८% गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. तर कुमारी समृद्धी संदीप नेहे हिने ९१.४०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक, तर समृद्धी दत्तू इल्हे हिला ९०.४०% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळाला आहे. तर जान्हवी महेश कोटकर हिने ८४.२०% गुण मिळवून चतुर्थ येण्याचा मान मिळवला आहे.

तसेच पाचवा क्रमांक दोन विद्यार्थ्यांना विभागून मिळाला आहे. त्यात साईश विठ्ठल दिघे आणि स्नेहल सचिन सातपुते या दोघांनीही ८४.२०% गुण संपादन केले आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांचे तसेच दहावी परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शालेय व्यवस्थापन, प्राचार्य फ्रान्सिस पटेकर, उपप्राचार्या अर्चना डोंगरे, पर्यवेक्षक प्रशांत शहाराव, कनिष्ठ महाविद्यालयीन प्रभारी शारदा नवले, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अहिल्यानगर काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी सचिन गुजर यांची फेरनिवड



श्रीरामपूर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

संघटन सृजन अभियान अंतर्गत निरिक्षकांनी महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष भेटी घेऊन काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करुन दिलेल्या अहवालाला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी मान्यता दिली असून त्यानुसार अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी सचिन गुजर यांची फेरनिवड झाली .

सचिन गुजर यांची तिसरी पिढी काँग्रेसमध्ये कार्यरत आहे. संघटन कौशल्य, वक्तृत्व आणि पक्ष वाढीसाठी असलेली तळमळ हे सगळे लक्षात घेता सचिन गुजर यांची जिल्हाध्यक्षपदी आठ महिन्यात दुसऱ्यांदा निवड झाली आहे. यापूर्वी सचिन गुजर यांनी युवक काँग्रेसचे अध्यक्ष, तालुकाध्यक्षए जिल्हा कार्याध्यक्ष, मुळा-प्रवरा वीज संस्थेचे व्हाईस चेअरमन, मार्केट कमिटीचे सभापती, श्री साईबाबा संस्थानचे विश्वस्त अशा महत्वपूर्ण पदांवर काम केले आहे.

स्व. जयंतराव ससाणे व काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांचे कट्टर समर्थक म्हणून सचिन गुजर यांची जिल्ह्यात ओळख आहे. निश्चितच त्यांच्या निवडीने काँग्रेस पक्षाला नवीन उभारी येईल. या निवडीचे काँग्रेस नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात, श्रीरामपूर राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, जिल्हा परिषद बांधकाम समितीचे माजी सभापती बाबासाहेब दिघे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सुधीर नवले, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, राष्ट्रीय काँग्रेसचे सचिव दिपाली ससाणे यांनी अभिनंदन केले आहे.

# ग्रामीण कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत खांडगाव येथे कृषीकन्या दाखल




संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालय, संगमनेर येथील अंतिम वर्षातील विद्यार्थिनी अभंग सृष्टी, धायतडक श्रुतिका, ईश्वरी भोर, कोरडे साक्षी, खुशाली गायकवाड व वैष्णवी भोसले, ग्रामीण कृषी अनुभव कार्यानुभव (रावे) कार्यक्रमअंतर्गत खांडगाव, तालुका संगमनेर येथे कृषीकन्या म्हणून दाखल झाल्या आहेत. खांडगावचे सरपंच अँड. विकास रावसाहेब गुंजाळ, उपसरपंच श्री लक्ष्मण रुपवते, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ या सर्वांनी विद्यार्थिनींचे मनपूर्वक स्वागत केले.

या रावे कार्यक्रमाच्या माध्यमातून कृषीकन्या गावपातळीवर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधून आधुनिक शेती तंत्रज्ञान, पिक व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, जलसंधारणा व विविध शेती योजनांची माहिती देणार आहेत. विद्यार्थ्यांना शेतपातळीवर सर्वांगीण अनुभव मिळावा व शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानांची माहिती मिळावी, हा या कार्यक्रमाचा उद्देश्य आहे.

सदर कृषी कार्यानुभव कार्यक्रम माजी मंत्री बाळासाहेब भाऊसाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली राबवला जाणार आहे. तसेच या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अनिल शिंदे आणि विश्वस्त श्रीमती शरयूताई देशमुख यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. या उपक्रमास कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ, प्रशासकीय अधिकारी श्री जी. बी. बाचकर, शैक्षणिक प्रमुख प्रा. रवींद्र दसपुते तसेच इतर प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# ज्येष्ठ निवेदक फारुक सय्यद यांचे निधन

संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

उर्दू साहित्य, शायरी, पत्रकारिता आणि प्रभावी निवेदन शैलीने लाखो रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ निवेदक तथा गुल बूटे मासिकाचे संपादक स्व. फारूक सय्यद यांच्या निधनाने उर्दू साहित्यविश्वावर शोककळा पसरली आहे.

त्यांच्या निधनाची बातमी समोर येताच उर्दूप्रेमींमध्ये हळहळ व्यक्त करण्यात आली. मधुर आवाज, अभ्यासपूर्ण भाषाशैली, विनोदी व उपरोधिक संवादकला आणि श्रोत्यांशी थेट नाळ जोडण्याची हातोटी, यामुळे फारूक सय्यद हे निवेदन विश्वातील बेताज बादशाह म्हणून ओळखले जात होते. उर्दूसोबतच मराठी भाषेवरही त्यांचे तितकेच प्रभुत्व होते. १९९६ मध्ये डॉ. कासिम इमाम यांच्या प्रेरणेने त्यांनी गुल बूटे हे उर्दू बालमासिक सुरू केले. या मासिकाने उर्दू बालसाहित्यात वेगळी ओळख निर्माण करत हजारो मुलांच्या मनात स्थान मिळवले.

जश्न-ए-बचपन सारख्या उपक्रमांतून त्यांनी बालविश्वाशी जिव्हाळ्याचे नाते जोडले. मुंबईपासून देशभरातील उर्दू मुशायरे, साहित्य संमेलने आणि परिषदांमध्ये फारूक सय्यद यांची उपस्थिती म्हणजे कार्यक्रमाच्या यशाची हमी मानली जात असे. चित्रपटसृष्टीतील दिलीप कुमार, सायरा बानो, राज बब्बर, सुनील दत्त, तलत अजीज यांसारख्या मान्यवरांशीही त्यांचे स्नेहसंबंध होते. त्यांच्या निधनाबद्दल जवाहरलाल नेहरू उर्दू सेंटरचे अध्यक्ष मोहम्मद इद्रीस शेख, उपाध्यक्ष सय्यद आसिफ अली, अँग्लो उर्दू हायस्कूलचे मुख्य विश्वस्त अब्दुल्ला चौधरी, चांद सुलताना उर्दू हायस्कूलचे अध्यक्ष राज मोहम्मद शेख, माजी मुख्याध्यापक शेख महमूद अहमद आदींनी श्रद्धांजली अर्पण केली.








पाहिजेत
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

पाहिजेत
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

पाहिजेत
स्वयंपाकीन - ०१ (२ व्यक्तींचा स्वयंपाक)
ड्रायव्हर - ०१
क्लार्क - ०१ (लेडीज/जेन्ट्स)
वॉचमन - ०१
अनुभवास प्राधान्य
9822334431

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

विवाह
भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्

# संगमनेर खुर्द–रायतेवाडी फाटा उड्डाणपूल आ. खताळ यांच्या नियोजनातून - गुंजाळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील वाढती वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी तसेच रायतेवाडी फाटा येथील अपघात टाळण्या साठी संगमनेर खुर्द-रायतेवाडी फाटा येथे उभारण्यात येणाऱ्या उड्डाणपुलाच्या कामाला आता गती मिळाली आहे. नागरिकांना कमीत कमी त्रास होईल आणि भविष्यातील वाहतूक सुरळीत राहील यासाठी आमदार अमोल खताळ यांनी सुरुवाती पासूनच विशेष लक्ष दिले आहे. त्यांच्या नियोजनातुनच हा उड्डाणपूल होत असल्याचे शिवसेनेचे उप तालुकाप्रमुख निलेश गुंजाळ यांनी सांगितले

लोकहिताला प्राधान्य विकास हवा, पण नागरिकांना त्रास नको, ही भूमिका घेत आमदार अमोल खताळ यांनी उड्डाणपुलाच्या डिझाईनपासून ते लांबी-रुंदीपर्यंत प्रत्येक बाबीचा बारकाईने आढावा घेतला. स्थानिक नागरिक, व्यापारी, शेतकरी आणि वाहनचालक यांच्या अडचणी लक्षात घेऊन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाचे अधिकारी, आणि उड्डाण पुलाचे काम करणारे कॉन्ट्रॅक्टर आणि स्थानिक नागरिकांसोबत आमदार खताळ यांनी सविस्तर बैठक घेतली. या बैठकीत पुढील मुद्द्यांवर ठोस निर्णय घेण्यात आले.

स्थानिक नागरिकांच्या सोयीसाठी साईडरोड ग्राउंड लेव्हलवरठेवण्याचा निर्णय स्ट्रिट लाईट, दिशादर्शक फलक, रिफ्लेक्टर आणि पाण्याच्या



निचऱ्याचे नियोजन रायतेवाडी फाटा अंडरपासलाही मंजुरी रायतेवाडी फाटा येथे अंडरपासची स्थानिकांची मागणी आमदार अमोल खताळ यांच्याकडे करण्यात आली होती. त्यानंतर अल्पावधीतच अंडरपासला मंजुरी मिळाली असून त्या कामालाही गती मिळत आहे. काम करताना नागरिकांना विश्वासात घेऊनच काम व्हावे तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या पलीकडे अतिक्रमण होणार नाही, याबाबत आमदार खताळ यांनी संबंधित यंत्रणेला स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

या उड्डाणपुलासाठी आमदार अमोल खताळ यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची दोन वेळा भेट घेऊन पाठपुरावा केला. कुंभमेळ्यापूर्वी कोणत्याही परिस्थितीत हे काम पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित कॉन्ट्रॅक्टरला देण्यात आल्या आहेत.

उड्डाणपूल असो वा अंडरपास, प्रत्येक काम नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठीच केले जात असल्याची भावना स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

स्थानिकांना विश्वासात घेऊन काम सुरू करण्याची आमदार अमोल खताळ यांची कार्यपद्धती संगमनेर करांसाठी दिलासादायक ठरत आहे.आमदार अमोल खताळ यांनी नागरिकांना विश्वासात घेऊन उड्डाण पुलाचे काम सुरू केले, हे कौतुका स्पद आहे. डिझाईन, लांबी-रुंदी आणि सोयी-सुविधांचे नियोजन उत्कृष्ट आहे. रायतेवाडी फाटा अंडरपाससह दोन्ही कामे संगमनेरच्या विकासाला गती देतील.

निलेश गुंजाळ

शिवसेना उपतालुकाप्रमुख, संगमनेर

## एल निनोमुळे प्रशासन अलर्ट

एल निनोमुळे महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता लक्षात घेता देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. त्यांनी ३० जूनपूर्वी कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले आहे. हवामान विभागाने एल निनोच्या प्रभावामुळे यावर्षी सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जलयुक्त शिवार योजनेचे प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. याव्यतिरिक्त, मुख्यमंत्र्यांनी बँकांना कृषी कर्जासाठी सिबिल स्कोअरची अट पूर्णपणे माफ करण्याचे निर्देश देऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे.

# शिर्डीमध्ये संरक्षण उत्पादन प्रदर्शन

## विद्यार्थी व नागरिकांना दोन दिवस रॉकेट आणि क्षेपणास्त्रे पाहण्याची संधी

शिर्डी (युवावार्ता प्रतिनिधी)-

शिर्डी येथील सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने २३ आणि २४ मे २०२६ रोजी विद्यार्थी आणि नागरिकांसाठी संरक्षण साहित्याच्या उत्पादनांचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये रॉकेट आणि क्षेपणास्त्रे विशेष आकर्षण असणार आहेत. देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते सावळीविहीर येथील औद्योगिक वसाहतीमध्ये निबे ग्रुपच्या संरक्षण उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच कार्यान्वित होत असलेल्या या प्रकल्पामुळे अहिल्यानगर जिल्हा देशातील महत्त्वाचे संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून



भविष्यात ओळखला जाईल.

या प्रकल्पामध्ये १५५ मिलीमीटर क्षमतेच्या तोफगोळ्यांचे उत्पादन करण्यात येणार आहे. प्रतिवर्षी पाच लाख तोफगोळे तयार करण्याची या कारखान्याची क्षमता आहे. या प्रकल्पाचे संपूर्ण उत्पादन तंत्रज्ञान व कच्चा माल स्वदेशी आहे. हा प्रकल्प अवघ्या एक वर्षात उभारण्यात आला आहे.

शिर्डी औद्योगिक वसाहतीतील सुमारे २०० एकर क्षेत्रावर विविध संरक्षण प्रकल्प विकसित करण्यात येत आहेत. यामध्ये रॉकेट लाँचर, लांब पल्ल्याच्या रॉकेटचे सुटे भाग, स्वयंचलित ड्रोन व विविध इलेक्ट्रॉनिक यंत्रणांच्या चाचणी सुविधा विकसित केल्या जात आहेत. उद्घाटनाच्या निमित्ताने २३ व २४ मे रोजी सकाळी १०.३० ते ५ या वेळेत विशेष संरक्षण प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

देशातील प्रमुख संरक्षण उत्पादन कंपन्या व १०० हून अधिक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. यासाठी मोठे स्टॉल्स प्रकल्पस्थळावर उभारण्यात आले आहेत. जिल्ह्यातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, विज्ञानप्रेमी, नागरिक आणि महिला या प्रदर्शनाला भेट देतील. तरुणांसाठी संरक्षण क्षेत्रातील संधी जाणून घेण्याची ही एक मोठी संधी निर्माण करून देण्यात आली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्याला संरक्षण क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. रणगाडा प्रशिक्षण केंद्र, के.के. रेंजेस व मेकॅनाईज्ड इन्फंट्री रेजिमेंटल सेंटरमुळे जिल्ह्याला आधीपासूनच संरक्षण क्षेत्रातील महत्त्व आहे. आता या नवीन संरक्षण उत्पादन प्रकल्पामुळे या ओळखीला अधिक बळ मिळणार आहे.

# विधानपरिषद निवडणुकीत नगरच्या जागेवर राष्ट्रवादीचा ठाम दावा

अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)-

अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या जागेवर राष्ट्रवादीचा दावा कायम आहे. काल शिष्टमंडळाने पक्षप्रमुख सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. तसेच, समन्वय समितीचे सदस्य हसन मुश्रिफ यांचीही भेट घेऊन, 'नगरची जागा आपलीच आहे, ती आपल्यालाच हवी,' अशी भूमिका मांडली. यावेळी पक्षश्रेष्ठींनी, 'याबाबत मुख्यमंत्र्यांकडे आग्रह धरला जाईल,' अशी ग्वाही दिल्याचे समजले.

अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्थेची जागा तीन पंचवार्षिकपासून राष्ट्रवादीच्या ताब्यात आहे. स्व. अजित पवार यांच्या नेतृत्वात गतवेळीही राष्ट्रवादीचे अरुणकाका जगताप विजयी झाले होते. त्यामुळे यावेळीही पहिला दावा हा विद्यमान आमदार असलेल्या आपल्या राष्ट्रवादी पक्षाचा असल्याची भूमिका कार्यकर्त्यांची आहे. यासाठी जिल्हाध्यक्ष कपिल पवार यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळ उपमुख्यमंत्री तथा पक्षप्रमुख सुनेत्रा पवार यांना भेटले. त्यांना महायुती म्हणून ही जागा आपल्याकडे राहावी, असा आग्रह धरला. त्यांनीही यावर मुख्यमंत्र्यांशी याबाबत चर्चा केली जाईल, असे सांगितले. तसेच, मुश्रिफ यांचेही कार्यकर्त्यांनी लक्ष वेधले. त्यांनाही सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे सांगितले गेले.

अहिल्यानगरमध्ये १२ विधानसभा मतदारसंघ आहेत. यापैकी भाजपाकडे चार आमदार असले, तरी राष्ट्रवादीकडेही संग्राम जगताप, आशुतोष काळे, किरण लहामटे आणि काशीनाथ दाते हे चार आमदार असल्याचे शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिले. त्यामुळे भलेही पक्ष म्हणून आपल्याकडे मतदारसंख्या कमी असेल; मात्र महायुती म्हणून भाजपाने मोठे मन करून ही जागा राष्ट्रवादीला सोडावी, अशीही अपेक्षा त्यांनी श्रेष्ठींकडे व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पक्षाचा आढावा घेतला. त्याचबरोबर नगरमधून इच्छुकांचीही शिष्टमंडळाकडून माहिती घेतली. यावेळी स्व. अरुणकाका जगताप यांचे सुपुत्र सचिन जगताप, तसेच माजी आमदार चंद्रशेखर घुले अशा दोन नावांवर चर्चा झाल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून समजले. यावर पक्षश्रेष्ठींनीही नगरच्या जागेवरील दावा सोडलेला नसल्याचे कार्यकर्त्यांना ठामपणे सांगितले. नगरची जागा राष्ट्रवादीकडेच ठेवावी, अशी कार्यकर्त्यांची भावना असल्याचे पक्षनेत्या सुनेत्रा पवार यांना सांगितले. त्यांनी, तसेच समन्वय समितीतील हसन मुश्रिफ यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. राष्ट्रवादीने दावा सोडलेला नाही.

कपिल पवार, जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता- श्री स्वामी समर्थ एजन्सी, स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क - 7030334486 7030334494

DRSGWF's
Vrindawan Homoeopathic Medical College & Hospital
(MHF's Homoeopathic Medical College and Hospital)
Chandanapuri Ghat, Sangamner, Dist.-Ahilyanagar, Maharashtra
Email- mhfhmc@gmail.com Phone- 9922382566, 9822314520.
(AFFILIATED TO M.U.H.S., NASHIK & NCH NEW DELHI)

WALK IN INTERVIEW

Application are invited from the Eligible Candidates for the following posts

| Sr. No | Department | Vacant Post | | |
|---|---|---|---|---|
| | | Professor | Associate Professor | Assistant Professor |
| 1 | Anatomy | 01 | | 01 |
| 2 | Organon of Medicine with Hom. Philosophy | | 01 | |
| 3 | Surgery | 01 | | |
| 4 | Gynecology& Obstetrician | 01 | | 01 |
| 5 | Repertory | 01 | | |
| 6 | Visiting Faculty (Psychology) | | 01 | |
| 7 | Visiting Faculty (Modern Pharmacology) | | 01 | |

Candidates holding Essential Qualifications & Experience as per Rules & Regulations of NCH- New Delhi & MUHS- Nashik will be eligible to apply.
The applicants are to submit their application within 15 days by email mentioned above.
Secretary

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
ICU INTENSIVE CARE UNIT
बदलत्या काळात अत्याधुनिक सुविधांनी युक्त
अतिदक्षता विभाग
24 HOUR SERVICE
सर्व प्रकारच्या कॅशलेस कंपनी सुविधा उपलब्ध
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25




दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com









# विकास लवांडे यांच्या अटकेच्या पार्श्वभूमीवर व्याख्यानात बदल

## पोलिस प्रशासनावर दबावाचे आरोप

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - वारकरी संप्रदायात मोठ्या प्रमाणावर कट्टरतावाद्यांची घुसखोरी झाल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे प्रवक्ते ह.भ.प. विकास लवांडे यांनी काही दिवसांपूर्वी वीस कथित बोगस वारकऱ्यांची यादी जाहीर केली होती. त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्यभर मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणानंतर त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच त्यांच्यावर संग्राम भंडारे यांनी शाईफेक केल्याची घटना देखील घडली होती.


प्रा. विठ्ठलराव शेवाळे

दरम्यान, पुणे पोलिसांनी विकास लवांडे यांना अटक केली असून, या पार्श्वभूमीवर संगमनेरमध्ये पुरोगामी संघटनांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या त्यांच्या व्याख्यानावरही परिणाम झाला आहे. आयोजकांच्या म्हणण्यानुसार, शहर पोलिसांनी दबावाखाली काम करत या व्याख्यानास परवानगी नाकारली असून आयोजकांना नोटीस बजावण्यात आली आहे.

या प्रकारावर विविध पुरोगामी संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त करत पोलिस प्रशासनाचा निषेध केला आहे. सरकारच्या दबावाखाली येऊन पोलिस अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि विरोधी विचारांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप आयोजकांनी केला आहे. दरम्यान, विकास लवांडे अटकेत असल्याने ते नियोजित व्याख्यानासाठी उपस्थित राहू शकणार नाहीत. त्यामुळे त्यांच्या ऐवजी प्रा. विठ्ठलराव शेवाळे यांचे मुक्त चिंतन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान रविवार, दि. २४ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता, व्यापारी असोसिएशन हॉल, पडतानी कॉम्प्लेक्स, संगमनेर येथे होणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अमर कतारी यांच्या पोष्टमुळे संगमनेरच्या राजकारणात खळबळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

सामाजिक कामानिमित्त गेल्या दोन दिवसांत संगमनेरमधील दोन आमदारांची भेट घेतल्याचा उल्लेख करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख अमर कतारी यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे अप्रत्यक्षपणे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांच्या या पोस्टमुळे शहराच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

अमर कतारी यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, ज्यांच्यासाठी दिवस-रात्र राबलो, प्रचार केला, त्याच आमदारांकडून आता आमचे सुस्थितीत असलेले, चांगल्या स्थितीतील गाळे पाडण्याचा प्रयत्न सुरू आहे. एका उद्योगपतीच्या फायद्यासाठी आमच्या व्यवसायासह शेकडो कुटुंबांना रस्त्यावर आणण्याचा प्रयत्न होत आहे असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

तर दुसऱ्या आमदाराची भेट घेतल्यानंतर त्यांनी सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. संजय गांधी नगर परिसरातील नागरिकांना हक्काचा सातबारा उतारा मिळवून देण्याची ग्वाही संबंधित आमदारांनी दिल्याचे त्यांनी नमूद केले. ज्याच्या विरोधात काम केले तो हक्काचा सातबारा देत आहे आणि ज्याच्यासाठी काम केले, प्रचार केला तोच रस्त्यावर आणण्याचा प्रयत्न करत आहे, अशा शब्दांत त्यांनी आपली खंत व्यक्त केली. अमर कतारी यांच्या या पोस्टमध्ये कोणत्याही आमदाराचे नाव स्पष्टपणे नमूद नसले तरी त्यांच्या वक्तव्यामुळे संगमनेरच्या राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना सुरुवात झाली आहे.

# गडगेची कोठडी कायम

## तिघांचा अटकपूर्व जामीन फेटाळला



युवावार्ता (प्रतिनिधी)

अनेकांची अंधश्रद्धेद्वारे फसवणूक करणारा व पैसे उकळणारा वडगाव पान (ता. संगमनेर) येथील भोंदू महाराज राजेंद्र बापू गडगे, मधुकर शिंदे हे दोघे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. या प्रकरणी एकूण पाच जणांविरोधात गुन्हा दाखल असून, त्यापैकी तिघे पसार आहेत. त्यांनी त्यांच्या वकिलांमार्फत येथील जिल्हा न्यायालय व अतिरिक्त सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता तो अर्ज गुरुवारी (ता. २१) न्यायालयाने फेटाळला आहे, अशी माहिती महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या बुवाबाजी संघर्ष विभागाच्या राज्य सचिव ॲड. रंजना पगार-गवांदे यांनी दिली.

कॅन्सरसारखे दुर्धर आजार मंत्राने, दैवी शक्तीने बरे करतो, मूल नसणाऱ्या स्त्रियांना मूल देत्तो, घरातील सर्व समस्या मंत्रशक्तीद्वारे बऱ्या करतो, असे सांगून अनेकांची अंधश्रद्धेद्वारे फसवणूक करत गेडये हा त्यांच्याकडून पैसे उकळायचा. त्याच्यासह डॉ. मोहन पुरी, ज्ञानेश्वरी गडगे (तिघेही रा. वडगाव पान, ता. संगमनेर) आणि सूरज शिंदे, मधुकर शिंदे (दोघेही रा. रहिमपूर, ता. संगमनेर) या पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल आहे. त्यांच्याविरोधात ॲड. पगार-गवांदे यांनी फिर्याद दिली आहे. गडगे महाराज आणि मधुकर शिंदे दोघे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. डॉ. मोहन पुरी, ज्ञानेश्वरी गडगे आणि सूरज हे तिघे पसार आहेत. नाशिक जिल्ह्यात आधीच ४ गुन्हे दाखल असलेला डॉ. पुरी हा पोलिसांना सापडत नसल्याने ॲड. पगार गवांदे आश्चर्य व्यक्त केले.

हा गंभीर स्वरूपाचा सामाजिक गुन्हा आहे. नागरिकांच्या आरोग्याशी, मालमत्तेशी आणि मानसिकतेशी खेळणारे मोहन पुरी आणि राजेंद्र गडगे यांना भोंदूगिरीला मदत करणारे अन्य आरोपी यांना त्वरित अटक होऊन गुन्ह्याचा तपास पुढे जाणे अत्यावश्यक आहे. अशी माहिती ॲड. रंजना पगार गवांदे यांनी दिली.

# डिझेलसाठी शेतकऱ्यांकडे सातबारा मागण्याच्या प्रकारावर संताप; खरीप मशागत धोक्यात - डॉ. नवले

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - खरीप हंगाम तोंडावर आला असताना शेतकऱ्यांना शेतीपूर्व मशागतीसाठी आवश्यक असलेल्या डिझेल खरेदीत अडथळ्यांचा सामना करावा लागत असल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक ठिकाणी पेट्रोल पंप चालकांकडून डिझेल देताना शेतकऱ्यांकडे सातबारा उताऱ्याची मागणी केली जात असल्याचे प्रकार समोर येत असून हा प्रकार अत्यंत संतापजनक आणि




शेतकरीविरोधी असल्याची प्रतिक्रिया माकपचे ज्येष्ठ नेते कॉ. डॉ. अजीत नवले यांनी व्यक्त केली आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात डॉ. नवले म्हणाले की, सध्या राज्यातील बहुतांश भागात खरीप हंगामाच्या पूर्वतयारीची लगबग सुरू झाली आहे. शेतकरी ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, पंप, मशागत यंत्रणा आणि अन्य कृषी उपकरणांच्या साहाय्याने शेतजमिनीची पूर्वमशागत करत आहेत. या सर्व प्रक्रियेसाठी मोठ्या प्रमाणात डिझेलची आवश्यकता असते. मात्र डिझेल खरेदी करताना काही पेट्रोल पंपांवर सातबारा दाखविण्याची अट घालण्यात येत असल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत सापडत आहेत. ते पुढे म्हणाले की, आधीच वाढती महागाई, खत-बियाण्यांच्या किंमती, अनियमित हवामान आणि शेती उत्पादनावरील वाढलेला खर्च यामुळे शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत डिझेलसारख्या मूलभूत गरजेवरही निर्बंध लादणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. सातबारा घेऊन पेट्रोल पंपावर जाणे ही प्रक्रिया वेळखाऊ असून ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांसाठी ती अतिरिक्त त्रासदायक ठरत आहे.

- या निर्णयामुळे खरीप हंगामातील पूर्वमशागत, पेरणी आणि शेतीची संपूर्ण तयारी धोक्यात येण्याची शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला. वेळेत मशागत आणि पेरणी झाली नाही तर त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होणार असून, याचे गंभीर परिणाम शेती अर्थव्यवस्थेवर होऊ शकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले. डॉ. नवले यांनी सरकारकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी करताना सांगितले की, जिल्हाधिकाऱ्यांमार्फत संबंधित प्रशासनाने पेट्रोल पंप चालकांना स्पष्ट आणि सक्त सूचना द्याव्यात, जेणेकरून शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा अनावश्यक त्रास सहन करावा लागू नये. तसेच खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आवश्यक असलेले डिझेल, खते, बियाणे आणि इतर कृषी साहित्य प्राधान्याने व सुरळीत उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे.

# संगमनेर एमआयडीसीला अखेर मंजुरी

## तरुणांच्या रोजगारासाठी मोठे पाऊल - आ. अमोल खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- तालुक्यातील तरुण-तरुणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण संगमनेरला एमआयडीसी सुरू करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे, उद्योग मंत्री उदय सामंत आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला असून एमआयडीसीला मंजुरी मिळाली आहे लवकरच एमआयडीसी बाबतचे नोटिफिकेशन निघणार असून तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महायुती व युवासेना कटिबद्ध असल्याचे आ. अमोल खताळ यांनी सांगितले.



संगमनेर शहरातील मालपाणी लॉन्स येथे युवासेनेच्या माध्यमातून रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी तरुणांना मार्गदर्शन करताना आ. खताळ बोलत होते. यावेळी व्यासपीठावर युवासेनेचे जिल्हाप्रमुख शुभम वाघ, भाजप राज्य कार्यकारिणी सदस्य दादाभाऊ गुंजाळ, शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजेंद्र सोनवणे, उपजिल्हाप्रमुख रमेश काळे, मंजाबापू साळवे, शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, महिला उपजिल्हा प्रमुख दिपाली वावळ, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी, युवासेना उपजिल्हा प्रमुख सौरभ देशमुख, तालुकाप्रमुख सुशील शेवाळे, शहरप्रमुख सार्थक शेवाळे, डॉ. अमोल कर्पे, आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान या रोजगार मेळाव्यासाठी ६०० तरुण-तरुणींनी मुलाखती दिल्या त्यापैकी १२५ तरुणी तरुणींनी तरुणीची प्राथमिक निवड करण्यात आली तर काहींना जागेवर ऑफर लेटर देखील देण्यात आले.

आमदार खताळ म्हणाले की, संगमनेरमधील तरुणांना त्यांच्या शिक्षणानुसार आणि कौशल्यानुसार नोकरी मिळावी, यासाठी शिवसेना युवासेना कटिबद्ध आहे. ग्रामीण भागातील तरुणांनाही रोजगाराच्या संधी मिळावी या उद्देशाने पारेगाव येथे नव्याने सुरू झालेल्या उद्योगात सुमारे ६०० ते ६५० युवकांना रोजगार देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. संगमनेरमधील उद्योजकांनीही पुढाकार घेत स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. या रोजगार प्रक्रियेसाठी तब्बल १ हजार ,८०० युवकांनी नोंदणी केली. त्यापैकी अनेकांनी ऑनलाइन अर्ज सादर केले. बीएससी, एमएससी, बीसीए, आयटीआय तसेच इतर विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या युवकां साठी लहान-मोठ्या स्वरूपाच्या नोकऱ्यांच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. प्रत्येकाने केवळ नोकरीच करावी असे नाही, तर काही तरुणांनी उद्योजक बनून इतरांना रोजगार द्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.







